# आता थेट मुंबई उच्च न्यायालयाच्या कॅन्टिनवर होणार कारवाई !

## तुकाराम मुंढेंचा धडाका सुरुच!, धक्कादायक तपशील उघड

प्रतिनिधी ३१ जुलै



**मुंबई** : अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या विभागाला मंगळवारी २८ जुलै रोजी मुंबई उच्च न्यायालयाने कारवाई संदर्भात प्रश्न विचारले होते.

त्यानंतर एफडीएचं पथक काल गुरुवारी उच्च न्यायालयात दाखल झालं. मुंबई उच्च न्यायालयाच्या आवारातील उपहारगृहांची तपासणी एफडीएकडून सुरू करण्यात आली. अन्न व औषध प्रशासनाकडून केलेल्या तपासणी दरम्यान उच्च न्यायालयातील एका उपहारगृहाची नोंदणीच झाली नसल्याचं स्पष्ट झालं. नियमानुसार नोंदणी नसलेल्या उपहारगृहांवर दंडात्मक कारवाईची तरतूद आहे. अन्न व औषध प्रशासनाने मुंबई उच्च न्यायालयाच्या परिसरातील कॅन्टिनची तपासणी केल्याने या कारवाईची चर्चा रंगली आहे.

मुंबई हायकोर्टाने मंगळवारी २८ जुलै झालेल्या सुनावणीत मुंबई उच्च न्यायालयानं खासगी आस्थापनांवर कारवाईचा धडाका लावणाऱ्या अन्न व औषध प्रशासनाच्या कारवाई पद्धतीवरच प्रश्चिन्ह उपस्थित केलं होतं. आजवर किती मंत्र्यांच्या आणि सरकारी आस्थापनांवर छापे टाकले अशी विचारणा करत मंत्रालयासह उच्च न्यायालय, सरकारी आणि निमसरकारी आस्थापनांचीही तातडीने तपासणी करण्याचे आदेश दिले होते. तुकाराम मुंढे यांनी एफडीएच्या कार्यपद्धतीवर ज्याप्रकारे कोर्टाने प्रश्नचिन्ह उपस्थित केल्याबद्दल प्रतिक्रिया दिली होती. ते म्हणाले की, 'एफडीएची कारवाई ही भारतात जो कायदा निर्माण झाला त्यानुसारच महाराष्ट्रात कारवाई होत असल्याचं' म्हटलं. तर दुसरीकडे छत्रपती संभाजीनगरमधील प्रयोग शाळेतील अधिकाऱ्यांनी तुकाराम मुंढे यांच्या कार्यपद्धतीवर जे प्रश्न उपस्थित केले आणि त्यांची तक्रार केली यावर तुकाराम मुंढेंनी प्रतिक्रिया दिलेली नाही.

### छत्रपती संभाजीनगरमधील प्रयोग शाळेतील प्रकरण काय?

» राज्य अन्न व औषध प्रशासनाच्या छत्रपती संभाजीनगर येथील प्रयोगशाळेतील अंतर्गत असंतोष उफाळून आला आहे. प्रयोगशाळेचे सहसंचालक तुकाराम मुंढे यांच्या कार्यपद्धतीविरोधात प्रयोगशाळेतील तब्बल २९ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी एल्गार पुकारला आहे. कर्मचाऱ्यांवर सकाळी ९ ते थेट रात्री १२ वाजेपर्यंत कामाची सक्ती केली जात असून, शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशीही कामावर हजर राहण्याचे कडक आदेश देण्यात आले आहेत. या कारभाराविरोधात सर्व २९ कर्मचाऱ्यांच्या सह्यांचे लेखी तक्रारपत्र थेट अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्याकडे सादर करण्यात आलं आहे.

# मंत्र्यांच्या वेळेपायी सांताक्रूझ-चेंबूर लिंक रोडवरील पूल रखडला!

प्रतिनिधी ३१ जुलै



**मुंबई:** गेल्या १० वर्षांपासून सांताक्रूझ-चेंबूर लिंक रोडमुळे मुंबईकरांना मोठा फायदा झाला आहे. पूर्व आणि पश्चिम द्रुतगती महामार्गांदरम्यान सिग्नल-मुक्त प्रवासासाठी या लिंक रोडचा वांद्रे कुर्ला संकुलापर्यंत विस्तार करण्यात आला आहे. कलानगर जंक्शनवरील वाहतूककोंडी कमी करण्यासाठी हा पूल बांधण्यात आला आहे. परंतु, दोन महिन्यांपूर्वीच या पुलाचं काम पूर्ण झालं आहे. परंतु, मंत्र्यांना वेळ नसल्यामुळे या प्रकल्पाचं उद्घाटन रखडलं आहे.

वांद्रे-कुर्ला संकुल - सांताक्रूझ-चेंबूर लिंक रोडपर्यंत विस्तारित पुलाची नागरिक अनेक महिन्यांपासून प्रतीक्षा करत आहे. या पुलासाठी सर्व आवश्यक तपासण्या आणि सुरक्षा चाचण्या पूर्ण झाल्या आहेत. वाहतुकीसाठी हा पूल सज्ज आहे. परंतु, अजूनपर्यंत औपचारिक उद्घाटन समारंभासाठी तारीख मंजूर झाली नसल्याने सोहळा लांबला आहे. या विलंबामुळे मुंबईतील सर्वात व्यस्त व्यावसायिक केंद्र असलेल्या वांद्रे कुर्ला संकुलात जाणाऱ्या हजारो नागरिकांचे हाल होत आहेत.

वांद्रे पूर्व येथील कलानगर जंक्शन मुंबईतील सर्वात व्यस्त मार्गांपैकी एक आहे. पश्चिम द्रुतगती महामार्ग, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्र-वरळी सी-लिंक, शीव आणि इतर अनेक महत्त्वाच्या मार्गांना जोडणारं हे जंक्शन आहे. गर्दीच्या वेळी प्रत्येक दिशेने वाहनचालक या चौकात येतात. त्यामुळे तासंतास प्रवासी वाहतूककोंडीत अडकलेले असतात. हा नवा उन्नत कनेक्टर सांताक्रूझ-चेंबूर लिंक रोडवरील एक 'मिसिंग लिंक' आहे. या पुलावर वाहतूक सुरू झाली की 'बीकेसी'मार्गे पूर्व ते पश्चिम द्रुतगती महामार्गावर सहजपणे प्रवास करता येणार आहे. त्यामुळे शहारतील सर्वाधिक वाहतूक कोंडी असलेल्या मार्गांना बायपास करून थेट प्रवास करता येणार आहे.

# जोगेश्वरी, साकीनाका पोलिसांची मोठी कारवाई: वर्षानुवर्षे फरार दोन आरोपींना अटक

प्रतिनिधी ३१ जुलै



**मुंबई** पोलिसांच्या जोगेश्वरी आणि साकीनाका पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांच्या स्वतंत्र कारवाईत, अनेक वर्षांपासून निगराणीखाली असलेल्या दोन फरार आरोपींना अटक करून न्यायालयासमोर हजर केले. अन्यथा, दोन्ही आरोपींविरुद्ध अजामीनपात्र वॉरंट (एनबीडब्ल्यू) जारी करण्यात आले असते.जोगेश्वरी पोलिसांनी १९९८ च्या गुन्ह्याप्रकरणी २८ वर्षांपासून फरार असलेल्या उमेश मुत्तुस्वामी गौंडर (५६) याला याला डोंबिवली येथून अटक केली. त्याच्याविरुद्ध गुन्हा क्रमांक १०७/१९९८ अंतर्गत भारतीय दंड संहितेच्या कलम ४५२, ४१७, ४२७ आणि ३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. न्यायालयाकडून दिलासा न मिळाल्यास, अंधेरीच्या १० व्या प्रथम वर्ग दंडाधिकारी न्यायालयाने त्याच्याविरुद्ध अजामीनपात्र वॉरंट आणि अंमलबजावणीपत्र जारी केले असते. गुप्त माहिती आणि तांत्रिक तपासाच्या आधारे, २७ जुलै रोजी रोझी समन्स वॉरंट जारी करण्यात आले आणि आरोपीला डूनजवळील डोंबिवली येथील त्याच्या तात्पुरत्या निवासस्थानातून अटक करण्यात आली. न्यायालयात हजर केल्यानंतर, न्यायालयाने त्याला २,००० रुपयांचा दंड, १०,००० रुपयांची सुरक्षा ठेव आणि १५,००० रुपयांच्या वैयक्तिक सुरक्षेतून मुक्त करण्याचे आदेश दिले. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक इक्बाल शिकलगार, पोलीस निरीक्षक बसवंत कोरे आणि पोलीस हवालदार तानाजी सुतार यांच्या नेतृत्वाखाली मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, सहायक पोलीस आयुक्त (कायदा-व्यवस्था) डॉ. मनोज कुमार शर्मा, अतिरिक्त पोलीस आयुक्त (पश्चिम प्रादेशिक विभाग) डॉ. अभिनव देशमुख, पोलीस उपआयुक्त दत्ता नलावडे, सहायक पोलीस आयुक्त राजेंद्र राणे यांनी केली.

# बनावट लेटरहेडवरून व्हीआयपी रेल्वे तिकिटांचा गोरखधंदा उघड

## आंतरराज्यीय टोळीतील 6 जण जेरबंद

प्रतिनिधी ३१ जुलै



**मुंबई:** लोकभवन कार्यालयाच्या नावाने बनावट लेटरहेड तयार करून त्यावर खोट्या स्वाक्षऱ्या, बनावट शिक्के आणि खोटा मजकूर वापरत रेल्वेच्या व्हीआयपी कोट्यातून तिकीट मिळवून देणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा मलबार हिल पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. रेल्वे प्रशासनाच्या तक्रारीनंतर गुन्हा दाखल करून तांत्रिक तपासाच्या आधारे उत्तर प्रदेश, गुजरात आणि मुंबई येथे कारवाई करत सहा आरोपींना अटक करण्यात आली. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये तारीक मेहफूज खान (३३), अमरीश ईश्वरलाल ठक्कर (४१), दीपककुमार कन्हैयालाल यादव (२७), विनय विक्रमसिंग रावत (२४), सागर ईश्वरलाल ठक्कर (३२) आणि अजय रामकुमार यादव ऊर्फ अनुप ऊर्फ मोहन (३४) यांचा समावेश आहे. यातील अमरीश ठक्कर हा या टोळीचा मुख्य सूत्रधार असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी केलेल्या तपासात अमरीश ठक्कर याच्याविरुद्ध यापूर्वी कुर्ला तसेच मुंबई सेंट्रल रेल्वे पोलीस ठाण्यात अशाच प्रकारचे गुन्हे दाखल असल्याचेही समोर आले आहे. कारवाईदरम्यान पोलिसांनी १२ मोबाईल फोन, एक लॅपटॉप, १६ सिम कार्ड, ७० क्रेडिट व डेबिट कार्ड, ४०० हून अधिक व्यक्तींच्या व्हीआयपी रेल्वे बुकिंगची गोपनीय माहिती असलेला डेटाबेस, दोन बनावट शिक्के, पाच आधार कार्डे आणि दोन स्टॅम्प पॅड असा मुद्देमाल जप्त केला आहे. जप्त करण्यात आलेल्या डेटाबेसमधील माहितीचा वापर करून आणखी कोणत्या प्रकारचे गैरव्यवहार करण्यात आले आहेत, याचाही तपास पोलीस करीत आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास मलबार हिल पोलीस ठाण्याकडून सुरू असून या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, तसेच अशा पद्धतीने किती जणांना व्हीआयपी कोट्यातून तिकिटे मिळवून देण्यात आली, याचा शोध घेतला जात आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त देवेन भारती, सहपोलीस आयुक्त (कायदा-सुव्यवस्था) मनोजकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रादेशिक विभाग) शैलेश बलकवडे, पोलीस उपआयुक्त (दक्षिण परिमंडळ-२) आर. रागसुधा आणि सहाय्यक पोलीस आयुक्त (गावदेवी विभाग) सुमन चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक भास्कर गोरखे, पोलीस निरीक्षक दिगंबर बिडवे, सहाय्यक पोलीस निरीक्षक रणजित चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक इंद्रजित मोहिते, अक्षय चौगुले यांनी केली.

# 'ड्रग फ्री मुंबई अभियानाला प्रवाशांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; प्रवाशांचा सक्रिय सहभाग

प्रतिनिधी ३१ जुलै



**मुंबई:** अंमली पदार्थमुक्त मुंबई घडविण्याच्या उद्देशाने मुंबई सेंट्रल रेल्वे पोलिसांतर्फे 'ड्रग फ्री मुंबई' जनजागृती अभियान राबविण्यात आले. या अभियानांतर्गत विविध रेल्वे स्थानकांवर क्यूआर कोडद्वारे अंमली पदार्थविरोधी शपथ घेण्यात आली. तसेच रेल्वे प्रवासी, पोलीस मित्र, रेल्वे सुरक्षाबल आणि पोलिसांच्या सहभागातून जनजागृती रॅली काढण्यात आली. या उपक्रमाला रेल्वे प्रवाशांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्त एम. राकेश कलासागर यांच्या मार्गदर्शनाखाली हा जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. अभियानाची सुरुवात मुंबई सेंट्रल रेल्वे पोलीस ठाण्यात अंमली पदार्थविरोधी शपथ घेऊन करण्यात आली. त्यानंतर मुंबई सेंट्रल टर्मिनसच्या मेन लाईन जनरल हॉल, मेन हॉल परिसर आणि बुकिंग हॉलमध्ये जनजागृती करण्यात आली. मुंबई सेंट्रल लोकल लाईन रेल्वे स्थानकासह महालक्ष्मी, लोअर परळ, प्रभादेवी, दादर पश्चिम, माटुंगा रोड आणि माहिम रेल्वे स्थानकांवरील फलाटांवरही अभियान राबविण्यात आले. या कार्यक्रमात रेल्वे पोलीस, रेल्वे सुरक्षाबल, रेल्वे प्रवासी, पोलीस मित्र सदस्य तसेच अंमली पदार्थविरोधी पथकातील पोलीस अधिकारी आणि अंमलदार सहभागी झाले होते. उपस्थितांनी क्यूआर कोड स्कॅन करून 'ड्रग फ्री मुंबई'ची शपथ घेतली. तसेच अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत माहिती देऊन नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. यानंतर सर्व उपस्थितांच्या सहभागातून रेल्वे स्थानक परिसरात अंमली पदार्थविरोधी जनजागृती रॅली काढण्यात आली. अंमली पदार्थमुक्त मुंबई घडविणे, रेल्वे प्रवाशांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जागरूकता निर्माण करणे आणि रेल्वे प्रवासी व पोलीस मित्रांचा सक्रिय सहभाग वाढविणे, हा या अभियानाचा प्रमुख उद्देश होता. या उपक्रमासाठी मुंबई सेंट्रल रेल्वे पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र मा. काटकर यांच्यासह तीन पोलीस अधिकारी आणि ४० पोलीस अंमलदार उपस्थित होते.

# मोठी कारवाई! ठाणे पोलिसांनी आरोपीसह दोन पिस्तुले आणि काडतुसे केली जप्त

प्रतिनिधी ३१ जुलै



**मुंबई:** ठाणे शहर गुन्हे शाखेच्या मध्यवर्ती गुन्हे शोध कक्षाने अवैध शस्त्रविक्रीविरोधात कारवाई करत हद्दपार करण्यात आलेल्या एका आरोपीला अटक केली. त्याच्याकडून दोन देशी बनावटीची पिस्तुले, चार जिवंत काडतुसे असा एकूण ९२,६०० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मध्यवर्ती गुन्हे शोध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रफुल्ल जाधव यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. ठाणे महापालिकेच्या अग्निशमन केंद्राजवळ, सर्व्हिस रोडलगत रेतीबंदर (कळवा) परिसरात एक व्यक्ती अवैध पिस्तुले विक्रीसाठी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन खाडे यांच्या पथकाने पंचांसमक्ष सापळा रचून संशयिताला ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव वाहिद मंजूर खान (२३), रा. पाटीलपाडा, आंबिवली पश्चिम, कल्याण असे असून तो केटरिंग व्यवसायात काम करत असल्याचे पोलिसांनी सांगितले. त्याची झडती घेतली असता दोन देशी बनावटीची पिस्तुले आणि चार जिवंत काडतुसे आढळून आली. तपासादरम्यान आरोपीला यापूर्वी ठाणे जिल्हा, मुंबई शहर आणि मुंबई उपनगर येथून १२ महिन्यांसाठी हद्दपार करण्यात आल्याचे उघड झाले. मात्र, कोणतीही पूर्वपरवानगी न घेता तो ठाणे शहरात वावरत असल्याने हद्दपारी आदेशाचाही त्याने भंग केल्याचे पोलिसांनी नमूद केले. या प्रकरणी कळवा पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार अधिनियम, १९५९ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीकडून अवैध शस्त्रांचा पुरवठा कोणाकडून केला जात होता आणि त्यामागील जाळ्याचा तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही कारवाई पोलीस उपायुक्त (गुन्हे) अमरसिंह जाधव आणि सहाय्यक पोलीस आयुक्त (शोध-२) विनय घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रफुल्ल जाधव यांच्या नेतृत्वाखालील मध्यवर्ती गुन्हे शोध कक्षाच्या पथकाने केली.

# मुंबई महापालिकेची पदपथ अतिक्रमण हटाव मोहीम

## पदपथांवर अतिक्रमण खपवून घेणार नाही; अश्विनी भिडे यांचे कडक निर्देश!

प्रतिनिधी ३१ जुलै



**मुंबई:** नागरिकांच्या सुरक्षित आणि सुलभ पादचारी वाहतुकीसाठी पदपथ अत्यंत महत्त्वाचे असून, ते कायमस्वरूपी स्वच्छ, चालण्यायोग्य आणि अतिक्रमणमुक्त ठेवणे ही संबंधित यंत्रणांची प्राथमिक जबाबदारी आहे. पदपथांवर कचरा, अनधिकृत वस्तू, बांधकाम साहित्य किंवा फेरीवाल्यांमुळे नागरिकांच्या समस्येबाबत कोणताही अडथळा निर्माण होणार नाही, यासाठी नियमित पाहणी करून तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त श्रीमती अश्विनी भिडे यांनी दिले. आयुक्त श्रीमती भिडे यांनी स्वच्छता व्यवस्थेच्या पाहणी दौऱ्याच्या अखेरच्या टप्प्यात एफ दक्षिण विभागातील जीजीभॉय गल्ली येथील स्वच्छता चौकी तसेच परळ येथील आयकर कार्यालयासमोरील स्वच्छता चौकीला भेट दिली. यावेळी त्यांनी परिसरातील स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि पादचारी सुविधांची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. पदपथांवरील अतिक्रमणे आणि इतर अडथळे वेळोवेळी हटविण्यासोबतच त्यांची पुनरावृत्ती होणार नाही, यासाठी प्रभावी आणि सातत्यपूर्ण निरीक्षण व्यवस्था राबवावी. नागरिकांना अखंड, सुरक्षित आणि सुलभ पादचारी मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने नियोजन करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. मुख्य रस्ते, हमरस्ते आणि शहरातील महत्त्वाच्या वाहतूक मार्गांची स्वच्छता कायम राखण्यासाठी प्रभावी नियोजन करावे. आवश्यकतेनुसार अतिरिक्त मनुष्यबळ आणि यंत्रसामुग्रीचा वापर करून संपूर्ण स्वच्छता व्यवस्थेवर सातत्याने देखरेख ठेवावी. शहरातील सार्वजनिक स्वच्छतेचा दर्जा उच्च राखण्यासाठी संबंधित यंत्रणांनी नियमितपणे कामकाजाचे परीक्षण करावे, असे निर्देशही त्यांनी दिले. परिमंडळ उपायुक्तांच्या मार्गदर्शनाखाली एम पूर्व आणि एफ दक्षिण विभागातील सहाय्यक आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे सहाय्यक अभियंते आणि कार्यरत चमू सार्वजनिक स्वच्छता, कचरा संकलन तसेच कचरा साचणाऱ्या संवेदनशील ठिकाणांच्या निर्मूलनासाठी करत असलेले प्रयत्न कौतुकास्पद असल्याचे श्रीमती भिडे यांनी नमूद केले. प्रत्येक विभागाची लोकसंख्या, भौगोलिक रचना आणि स्थानिक समस्या वेगवेगळ्या स्वरूपाच्या असतात. त्यामुळे मध्यवर्ती यंत्रणेमार्फत सर्वसाधारण नियोजन आणि व्यवस्था केली जात असली, तरी प्रत्येक विभागाच्या स्थानिक गरजा आणि सूक्ष्म स्तरावरील अडचणी संबंधित विभागीय चमूला अधिक चांगल्या प्रकारे समजू शकतात, असे त्यांनी सांगितले. स्वच्छता व्यवस्थापनातील सुधारणा ही एकदाच पूर्ण होणारी प्रक्रिया नसून ती सातत्याने सुरू ठेवावी लागते. शहरातील स्वच्छता, कचरा संकलन आणि संवेदनशील ठिकाणांचे निर्मूलन यासाठी निरंतर प्रयत्न आवश्यक असल्याचे महानगरपालिका आयुक्त यांनी यावेळी स्पष्ट केले.

# मंत्रिबैठकीचा 'महाराजा' थाट! एअर इंडिया इमारतीत लवकरच मंत्र्यांची दालने हलवणार!

प्रतिनिधी ३१ जुलै

मुंबई : बाविसाव्या मजल्यावरून दिसणारा अथांग समुद्र, त्यासोबत लाटांची निरंतर गाज, अविरत वाहणारा वारा यांच्या साथीने राज्याच्या महत्त्वाच्या विषयांवर मसलती... राणीचा हार म्हणून सुपरिचित असलेल्या नरिमन पॉइंट येथील एअर इंडिया इमारतीत आता मंत्रिमंडळाच्या बैठका 'महाराजा' थाटात होणार आहेत.

राज्य सरकारने जवळपास १६०० कोटी रुपये खर्चून केंद्राकडून एअर इंडिया इमारत घेतली आहे.

या ठिकाणी कार्यालय मिळावे यासाठी मंत्रालयातील अनेक वरिष्ठ अधिकारी वाट बघत आहेत. अथांग समुद्राची साथ लाभलेल्या या इमारतीत राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीसाठी आणि इतर महत्त्वाच्या बैठकांसाठी मंत्रिमंडळ समिती कक्ष उभारण्यात येणार आहे. इमारतीच्या २२व्या मजल्यावर या कक्षाचे काम सुरू करण्यात येणार असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सूत्रांनी दिली. सार्वजनिक बांधकाम विभागाने या इमारतीचे पाहणी पूर्ण केली असून लवकरच याठिकाणी राज्य सरकारच्या काही विभागांची कार्यालये स्थलांतरित करण्यात येणार आहेत.

याशिवाय या इमारतीच्या २२व्या मजल्यावर मंत्रिमंडळाच्या नियमित बैठका, विविध मंत्रिमंडळ उपसमित्यांच्या बैठकांसह महत्त्वाच्या उच्चस्तरीय शासकीय बैठका याच कक्षात घेण्याचे नियोजन आहे. त्यानुसार २२व्या मजल्यावरील जागेचे अंतर्गत बांधकाम, ध्वनी व्यवस्था, अत्याधुनिक व्हिडीओ कॉन्फरन्सिंग सुविधा, डिजिटल सादरीकरणासाठी आवश्यक यंत्रणा आणि सुरक्षा व्यवस्थेची उभारणी सुरू झाली आहे. बैठकीदरम्यान गोपनीयता आणि सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक असलेले सर्व निकष पूर्ण करण्यावर भर दिला जात आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ओम शिव साई सीएचएस, पहिला मजला, बीएमसी मार्केट, रनवाल व ओंकार ई-स्क्वेअर जवळ, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र – ४०००२२. येथे प्रकाशित केले. ♦ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ♦ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 26 /A 3072, RRC Helpline No. 8484842135